*Vidyabharati International Interdisciplinary Research Journal 3(1)* 161-162 ISSN 2319-4979

# लोकसंगीत तथा भावसंगीत यांची सौंदर्यमूल्ये

**एम. नवसाळकर आणी एन. मंगरुळकर**
अमरावती
musicmeera@gmail.com

## सारांश

*सृजनशीलता ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती होय. माणसाला सौंदर्यसृष्टीचेही वरदान लाभलेले आहे.ण्या दोहोंच्या समूहाने शास्त्रीय संगीत,उपशास्त्रीय संगीत,नाट्यासंगीत,सुगम संगीत,लोकसंगीत,चित्रपटसंगीत इ. अनेक प्रकार मनुष्याने निर्माण केले असून त्यामुळे आपले दैनंदिन जीवन समृध्द आणि सुखावह झाले आहे भाषा म्हटली की त्यात अनेक भाव व्यक्त करता येतात त्याचबरोबर काव्यातही व्यक्त करता येतात. पुढे त्यांना स्वराची जोड देण्यात आली व ते अधिक परिणामकारक झाले यातूनच भावसंगीत व लोकसंगीताची निर्मिती झाली.*

निरनिराळया सामाजिक घटना किंवा प्रसंग समाजात घडतात.त्यानुसार संगीताचे विविध प्रकार प्रचारात आलेले आढळतात.मानवी जिवन सुसंस्कृत,समृध्द करण्याचे साधन संगीत होय. माणसाच्या मनातील भावनांचा सामाजिक परिस्थितीशी संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य संगीत करते. या संगीताच्या विविध प्रकारांपैकी सामाजिक जीवनाला प्रतिबिंबीत करणारे 'लोकसंगीत' तर मनातील भावना व्यक्त करणारे 'भावसंगीत' होय.

यांपैकी भावसंगीताचा जर विचार केला तर सर्वप्रथम भावसंगीत म्हणजे काय याचा विचार करू. सर्वसाधारण श्रोत्यांना आकर्षित करुन घेणारा असा हा गानप्रकार आहे. याचे कारण असे सांगता येईल की या गानप्रकारामधे असलेली सरलता व सुलभता होय. म्हणूनच त्याला 'सरलसंगीत' किंवा 'सुगमसंगीत'(स्पहीज डनेपबद्व असेही म्हणतात. भाव व्यक्त करणारे संगीत म्हणजे 'भावसंगीत' होय. किंवा सरळ गीत रचना, रसाळ चाल व अर्थप्रधान शब्द या तिन्हींचा संगम म्हणजे भावसंगीत असे म्हणता येईल. भाव संगीतामध्ये सरळसरळ गीतरचना, आकर्षक व रसाळ चाल व अंत:करणाला भिडणारा शब्दातीत भाव व हे सर्व सहजपणे समजू शकेल अशी त्याची धाटणी असल्यामुळे ते अधिक लोकप्रिय झाले आहे. कारण कोणत्याही भावना गद्यात व्यक्त करण्यापेक्षा त्या संगीतात व्यक्त केल्याने अंत:करणाला जाऊन भिडतात किंबहुना परिणामकारक होतात, त्या भावनांची जाणीव लवकर होते. म्हणूनच अभिव्यक्ती व अनुभूती ह्या दोन्ही गोष्टी भावसंगीतात एकत्रपणे दिसून येतात. उदाहरण द्यायचे तर "घन:श्याम सुंदरा" या सुप्रसिध्द भूपाळीचे द्यावे लागेल. ही भूपाळी काव्याच्या दृष्टीने उत्तम असली तरी ती नुसतीच वाचल्याने त्यातील शब्द आपल्याला आकर्षित करू शकत नाही पण तीच स्वरबध्द केली

तेव्हा ते ऐकून मन भारावून जाते. अंत:करणाला सुखद भावनेचा स्पर्श होतो. स्वरांचा आणि शब्दांचा सुंदर संगम भावसंगीतात दिसून येतो. भा.रा.तांबे, कुसुमाग्रज,बालकवी,केशवसुत,प्र.के.अत्रे अशा अनेक दिग्गज कवींच्या, तर संत तुकाराम,संत नामदेव,कान्होपात्रा ई. संतांच्या रचना यांच्यामधून स्वरांच्या साजाने निश्चितच अत्युच्च भावाची निर्मिती झालेली आहे, याच प्रमाणे "जन पळभर म्हणतील हाय हाय" किंवा "कळा ज्या लागल्या जीवा" ह्या भा.रा. तांबे ह्यांच्या वांङमयीन मूल्य अधिक असलेल्या रचनांना सुध्दा स्वरसाज चढविल्याने त्या रचना अधिक अर्थवाही होऊन अजरामर झाल्या. माधव ज्युलीयन यांची 'आई' ही कविता त्यांनी ऐकल्यनंतर ते म्हणाले, "माझी 'आई' ही कविता इतकी चांगली आहे हे मला आत्ता कळालं !"[१] तात्विक, गहन असे अर्थ असलेल्या रचना सुध्दा स्वरांच्या साहाय्याने समजण्यास सुलभ होतात.पण भावसंगीताला सुगम संगीत जरी म्हणत असले तरीही ते 'सुगम' मुळीच नाही. संगीतातील कोणताही प्रकार सुगम नाही, भावसंगीत गाणे म्हणजे शब्दप्रधान गायकीचा विचार, चिंतन, मनन होय. हा प्रकार गातांना शब्दामागील स्वरांना किती प्रमाणात स्पर्श करायचा, चालीतील दोन शब्दांमधील अंतर, अर्थानुसार शब्दांवर दिलेल्या स्वरसंहती, शब्दांची फेक, शब्दांचा भाव, स्वरांचे थांबे ओळखून स्वरांचा हळूवारपणा ई.गोष्टी अंतर्भूत असतात. एकंदरीतच भावसंगीत गाण्याची एक वेगळी Style (शैली) आहे. त्या एका विशिष्ट शैलीने भावसंगीताचा आविष्कार केल्यास ते निश्चितच परिणामकारक होईल यात शंका नाही. .

सुगम संगीताचाच एक भाग म्हणजे 'लोकसंगीत' होय. लोकसंगीत हे शास्त्रीय संगीताची गंगोत्रीच म्हणावे लागेल. लोकसंगीताची व्याख्या करणे काहीसे अवघड असले तरी लोकसंगीत हे "लोकांनी लोकांसाठी लोकभाषेत केलेले काव्य" अशी स्थूल मानाने लोकसंगीताची केलेली व्याख्या करता येईल. तसेच लोकसंगीताचे अभ्यासक देवीलाल सामर यांनीसुध्दा

लोकसंगीताची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे. 'साधारणत: यह सबकी मान्यता है की वह गीत लोकगीत है, जो जनसाधारण द्वारा प्रयुक्त होता है और जनसाधारण की भावनाओंको व्यक्त करता है।' [२].

लोकसंगीताला पहाडातून फुटून स्वच्छंदपणे वाहणाऱ्या झऱ्याची उपमा दिली आहे. आणि ही उपमा सार्थच आहे कारण लोकगीताचा जन्मच मुळी लोकजीवनातून झाला आहे. प्राचीन काळी लोक हे अध्यात्म वृत्तीचे असल्यामुळे परमेश्वराची उपासना करणे हे मुख्य उद्दीष्ट होते. त्यानंतर मानव जसजसा प्रगत होत गेला, एकत्रपणे राहू लागला व जीवन अधिक उद्योगी बनू लागला तसतसे त्याच्या जीवनात एकूणच परिवर्तन घडून येऊ लागले.श्रमपरिहार व मनोरंजनासाठी काहीतरी साधन असण्याची आवश्यकता भासू लागली. म्हणून श्रमाला विसरण्यासाठी लय हे प्रमुख साधन झाले.तर या लयीच्या जोडीला सार्थ शब्दांची साथ मिळून ते एक लययुक्त काव्य बनले. पुढे कालांतराने या काव्याला स्वराची जोड मिळून लोकसंगीताचा जन्म झाला. म्हणूनच लोकसंगीत हे भारतीय संस्कृतीचे प्रमुख अंग ठरले आहे. संगीताला आवश्यक असणाऱ्या चारही घटकांचा पाया लोकसंगीताने रचला आहे. हे चार घटक म्हणजे १) लय तत्व २) स्वर तत्व, ३) भाषा तत्व ४) भाव तत्व होय. या चार घटकांमुळे लोकसंगीताला खरे मूर्त स्वरूप प्राप्त झाले. या चार तत्वांपैकी लय आणि भाषा यांचे प्रमाण स्वर आणि भाव या पेक्षा निश्चितपणे अधिक असते. यामध्ये स्वरांचा अधिक प्रमाणात प्रयोग दिसत नाही. म्हणूनच लोकसंगीतामध्ये ' धून ' असते. कारण जो पर्यंत नुसत्याच गीतांना विशिष्ट स्वराची जोड मिळाली नव्हती पर्यंत त्यामध्ये चैतन्य व जीवंतपणा दिसून येत नव्हता. म्हणूनच मुख्य भाषा व लय तर त्यांना अनुरूप अशी ठराविक स्वरांची जोड या दृष्टीनेच स्वरांचे महत्व ठेवले गेले. स्वरांप्रमाणेच भावतत्व गौण असले तरी त्याचे महत्व कमी नाही कारण रसनिर्मिती ही लोकरंजनाचा पाया आहे आणि लोकरंजन हे लोकसंगीताचे साध्य आहे.

पूर्वीच्या काळापासून चालत आलेली परंपरा आणि पूर्वजांनी त्या परंपरेचे केलेले जतन ह्याचे अक्षय स्वरुप टिकून राहण्याकरीता तद्वतच नवीन पिढीला त्या परंपरेची आस आणि औत्सुक्य या संबंधी प्रकर्षाने केलेली चळवळ ती लोकगीतात प्रतिबिंबित होते. वाद्यांचा लोकगीतात मुख्यत: साथीसाठीच उपयोग होत असतो. वाद्यांचे स्वतंत्र वादन किंवा वाद्य वादनाला संगीताविष्कारात महत्वाचे स्थान मिळणे त्याची लोकसंगीताच्या संदर्भात-शक्यता कमीच आहे.

लोकसंगीताच्या महत्वाच्या वैशिष्ट्यांपैकी एक महत्वाचे अंग म्हणजे सामूहिकतेचे अंग होय. लोकगीतांच्या आशयापासून ते सुरावटी पर्यंत सर्वांवरच सामूहिकतेचा पगडा दिसून येतो. या गीतांच्या एकंदर लक्षणावरुन त्यामध्ये व्यापकता व विविधता अधिक दिसते. विषयानुसार आणि भारतातील विविध प्रांतानुसार लोकसंगीताचे प्रकार पडले आहेत. उदाहरणादाखल हे प्रकार येतील

१) लोकीकगीते-पोवाडा, लावणी .पोवाड्यामध्ये वीर रस तर लावणीमध्ये श्रृंगार रस.
२) निसर्ग गीते
३) अंगाई गीते
४) पारंपारिक लग्नाची गाणी
५) संस्कार गीते
६) देशभक्तीपर गीते
७) धार्मिक गीते (आरत्या वगैरे) इ.

या प्रकारांमध्ये असणाऱ्या अनेक रचना प्रसिध्द आहेत. अगोदरच उधृत केल्याप्रमाणे लोकसंगीतातूनच शास्त्रीय संगीताच जन्म आहे, सर्व राग हे लोकसंगीतातच मिळतात. या बाबत पं. कुमार गंधर्व यांनी काही विचार व्यक्त केले आहेत ते असे, 'अनुभव से इस निर्णय पर पहूँचा हूँ की राग बनाये नही जाते, बनते है। हम लोकधूनो मे रागों को छुपा हुवा पाते है। लोकधूनोंमे कोई ना कोई राग अवश्य होता है..। अत: स्पष्ट है की शास्त्रीय राग लोकधूनोंमे छिपे हुवे रागोंके विकसित स्वरुप होते है।"[3] तसेच श्री देवीलाल सामर यांनीसुध्दा रागसंगीताचे मूळ लोकसंगीतातच सांगितले आहे. तर मिश्रराग सुध्दा लोकसंगीतात असतात अशा प्रकारचे ठामपणे प्रतिपादन ते करतात.

म्हणूनच लोकसंगीत हे भारतीय संगीताला वरदान ठरले आहे. लोकसंगीत हे एकट्याचे नसून सर्वांचे आहे. लोकसंगीत हे सर्वांना समजेल अशा भाषेत व कोणालाही म्हणता येईल अशा सुलभ स्वररचनेत, कोणही तल्लीन होवून जाईल अशा लयीत रचलेले असल्यामुळे ते कोणालाही आकर्षित करु शकते इतके ते प्रभावी आहे.

## संदर्भसूची

१. डॉ श्रीराम संगोराम, मुक्त संगीत संवाद
२. अशोक रानडे, लोकसंगीत शास्त्र
३. पं.कुमार गंधर्व, संगीत लोकसंगीत अंक